Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.lbp.world

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**प्रा. राजकुमार रंगनाथ सोनवले**
**देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.**

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षणाचे महत्त्व जाणून आहेत ते म्हणतात की, 'शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे, जो पिणार तो गुरगुरल्याशिवयाय राहणार नाही'. आजच्या काळामध्ये सामाजिक व आर्थिक प्रगतीचे महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. व्यक्ती व समाजात परिवर्तन, प्रबोधन घडवून आणणारे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण हेच आहे. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण सामाजिक जाणिवा निर्माण करणारे महत्त्वाचे साधन मानले आहे. ते म्हणतात की, "हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाचे उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजेच त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्यांचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज पध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने कायम महत्त्व आहे. याची जाणिव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आजच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे"[1].

वरील उद्गारावरून डॉ. बाबासाहेबांचे शिक्षण विषयक मत आपल्या लक्षात येते. डॉ. बाबासाहेब शिक्षण ही स्वातंत्र्याची प्रेरकशक्ती आहे असे मानत असत. कारण शिक्षणच माणसाला विचार, मत देते, व्यक्तीच्या बुध्दीचा विकास करते, स्वतःची ओळख करून देते. तेव्हा डॉ. बाबासाहेब हे शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात की, "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो"[2]. त्यामुळेच डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघीणीचे दुध म्हटले आहे.

तळहातावर जीव घेवून जीवनाची वाटचाल करणाऱ्या हजारो वर्षे अंधाराच्या खायेत खितपत पडलेल्या अस्पृश्यांच्या या जीवघेण्या जगण्याबद्दल डॉ. बाबासाहेबांना मनस्वी खेद वाटतो. म्हणून ते म्हणतात की, "व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना जर मान्य असेल तर दरेक व्यक्तीच्या ठायी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरूर आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही"[3].

म्हणजे कोणत्याही देशात व्यक्तिस्वातंत्र्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा स्वातंत्र्याने राष्ट्राच्या रक्षणाची कल्पना मूळ धरू शकते. अशी ही कल्पना शिक्षणामुळे मूळ धरेल अन्यथा ते अशक्य आहे. म्हणजे डॉ. बाबासाहेब शिक्षणाचा संबंध मानवी गुलामीशी जसे जोडतात तसेच ते सामाजिक जाणिवाशी ही जोडतात.

पुढे जाऊन शिक्षणाचा संबंध राष्ट्राच्या रक्षणाशी ही जोडतात. तेव्हा शिक्षण हे व्यक्ती, समाज, राष्ट्र या तिन्हींच्या ही दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे असे डॉ. बाबासाहेब सांगतात.

- **प्राथमिक शिक्षण हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे :—**

शिक्षणाच्या विविध पातळीवरचा विचार करता प्राथमिक शिक्षणाचा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असा आहे, असे डॉ. बाबासाहेबांचे मत आहे. सन 1882 मध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणासंबंधीचे विचार मांडताना म्हटले होते की, "काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत निदान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे असे माझे मत आहे"[4].

दिनांक 25/07/1917 मध्ये शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणारा कायदा करून त्याची अंमलबजावणी केली. तर महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सन 1906 मध्ये आपल्या बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणारा कायदा केला. डॉ. बाबासाहेबांच्या द्रष्ट्या प्रयत्नामुळे संविधानाच्या कलम 45 मध्ये घटनेचा अंमल झाला. त्या तारखेपासून दहा वर्षाच्या आत सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावी अशी तरतूद केली व भारत सरकारने हा कायदा 01 एप्रिल 2010 पासून लागू केला. त्यावरून शासनाचे शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात येतो.

शिक्षणाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब हे परदेशात गेले होते. तेव्हा त्यांनी तेथील शिक्षण प्रशासन व्यवस्था व बौध्दिक जीवन जवळून पाहिले. उद्या जेव्हा आपला देश स्वतंत्र होईल तेव्हा आमच्यासह जे मागास, वंचित, दुर्लक्षित आहेत, त्या सर्वांचे मानवी हक्क केवळ शिक्षणानेच शाबूत राहतील असे त्यांना वाटत होते. भारतातील दलित, पददलितांच्या दैन्यावस्थेवर उपाय म्हणजे शिक्षण हे 'रामबाण' उपाय होय, अशी त्यांची खात्री होती.

- **जुन्या शिक्षण पध्दतीला विरोध :—**

डॉ. बाबासाहेबांनी मूठभरांच्या हातातील बाहुले बनलेल्या या जुन्या शिक्षण पध्दतीला कडाडून विरोध केला आहे. कारण जुनी शिक्षण पध्दती ही उच्चवर्णीयांच्या नियंत्रणाखाली आहे. दुसऱ्यांनी ती संपादित करू नये अशी त्यांची विचारसरणी आहे. या उलट ब्रिटिशांनी सर्वांसाठी शिक्षण खुले करून बहुजनांच्या उध्दाराचा मार्ग खुला केला. त्यामुळे येथील जातीवाद्यांची पकड सैल झाली, असे डॉ. बाबासाहेब म्हणतात.

- **शिक्षण ही पवित्र संस्था :—**

डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाशी संबंधित शिक्षण संस्था, शिक्षक, विद्यार्थी या घटकांबाबत अत्यंत तळमळीने विचार मांडले आहेत. त्यांच्या मते शिक्षण ही एक पवित्र संस्था आहे. शिक्षण संस्था या उत्तम नागरिक निर्माण करणारे कारखाने व पवित्र क्षेत्र असते. शिक्षण संस्थाचे कार्य मुनष्यांची मने सुसंस्कृत करण्याचे असते. त्या समाजात मानवतेचे, राष्ट्रीयतेचे, समानतेचे व अज्ञान दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असतात. त्यामुळे शिक्षण संस्था इतर सामाजिक संस्थापेक्षाही अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

- **शिक्षण हीच जीवनातील महत्त्वाची बाब :—**

डॉ. बाबासाहेबांनी स्वतःच्या आयुष्यात विद्या, विनय, शील यांना दैवत मानले. विद्येचे महत्त्व सांगताना ते म्हणतात "विद्येशिवाय माणसाला शांतता नाही आणि माणुसकीही नाही. तो महासागरासारखा आहे. माणसाला जगण्यासाठी जशी अन्नाची आवश्यकता आहे तशीच विद्येची ही !"[5] त्यांच्या मते पाश्चात्य राष्ट्रांचा विकास शिक्षणामुळेच झालेला आहे. एवढेच नाही तर भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात पाश्चात्य शिक्षणाचा फार मोठा सिंहाचा हातभार लागला आहे. समाजाचा, राष्ट्राचा, व्यक्तीचा सर्वांगीण विकास शिक्षणामुळे होतो. शिक्षणामुळे मनुष्य निर्भय, स्वाभिमानी, स्वावलंबी बनतो, अन्यायाविरूध्द बंड करण्याची वृत्ती बळावते.

शोषितांचे शोषण थांबते, गुलामगिरी नष्ट होते. तेव्हा सुशिक्षितांनी आपल्या अशिक्षित बंधुकडे लक्ष द्यावे. तसे न घडल्यास समाजाचा ऱ्हास होईल. आपल्या दरिद्री व अज्ञानी बंधुचे दारिद्र्य व अज्ञान दूर करणे हे प्रत्येक सुशिक्षिताचे आद्यकर्तव्य आहे. शिक्षण हीच जीवनातील अत्यंत महत्त्वाची बाब होय.

- **शिलाविना शिक्षणाची किंमत शून्य आहे :—**

रावळी कॅम्प येथे 3 जून 1953 मध्ये डॉ. बाबासाहेबांचे भाषण झाले. त्यावेळी ते म्हणतात की, "शिक्षणाचे महत्त्व आहे मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शिलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे, समजा एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे तर तिचा सदुपयोग की दुरूपयोग करायचा हे त्या माणसाच्या शिलावर अवलंबून राहील. तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा एखाद्याचा बचावही करील. ज्ञानाचे ही तसेच आहे. एखादा शिकलेला माणूस त्याचे शील चांगले असेल तर आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करील. परंतु त्याचे शील चांगले नसेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्याकडे खर्च करील"[6].

- **शिक्षक हा राष्ट्राचा सारथी आहे :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते उच्चवर्णीय वर्ग हा पूर्वीपासून विद्येचा उपासक आहे. या वर्गाने इतरांच्या बुध्दिमत्तेविषयी नेहमी शंकाच उपस्थित केलेल्या आहेत. अशा लोकांच्या हाती शिक्षणाची सूत्रे असणे धोक्याचे आहे. इतकेच नाही तर ते पुढे म्हणतात की, समाजातील वंचित, दुर्बल, मागास वर्गाने आता शिक्षण क्षेत्राकडे वळले पाहिजे. थोडासा प्रयत्न केला तर शिक्षक पेशामध्ये कोणासही कौशल्य संपादीत करता येईल. शिक्षक, शाळा व शिक्षण यांचा अन्योन्यसंबंध स्पष्ट करताना ते म्हणतात की, "शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी. पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाजहितास योग्य असे वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. अर्थात या कारखान्यात फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे. शाळा म्हणजे काही हिंदू उपहारगृह नव्हे की त्यात ब्राह्मण भटचारी ठेवला की भागले. ब्राह्मणाच्या हातचे अन्न जरी सर्वांना चालत असले तरी ब्राह्मणांच्या हातचे शिक्षण या काळात कोणासच चालणे शक्य नाही"[7]. त्यामुळे त्यांनी पारंपरिक शिक्षण पध्दतीला विरोध केला ते म्हणतात की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी केवळ प्राथमिक शिक्षण घेवून थांबू नये तर त्यांनी उच्च शिक्षणापर्यंत मजल मारावी. कारण उच्च शिक्षण केवळ एका विशिष्ट वर्गाची मिरासदारी बनता कामा नये. समाजातील प्रत्येक वर्गापर्यंत ते पोहचले पाहिजे. जातिनिष्ठ वृत्ती व केंद्रीकरणामुळे शिक्षणाचा हा प्रवाह तुंबला गेला आहे. त्यामुळे ते शिक्षणाच्या विकेंद्रीकरणाची मागणी करतात. शैक्षणिक क्षेत्रातील संस्कारकर्ता आणि त्याचे केंद्र बदलल्याविना शिक्षणाचे स्वरूप बदलणार नाही असे त्यांना वाटते. तसेच या क्षेत्रात राजकारणी व्यक्तीचा शिरकाव होता कामा नये असे म्हणतात. त्यांच्यामुळेच भारतामध्ये शिक्षण प्रगती झालेली नाही असे त्यांचे ठाम मत आहे. त्यामुळे ते शिक्षणाचे संपूर्ण नियंत्रण व नियमन शिक्षण तज्ज्ञाकडूनच व्हावे. राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप अतिअल्प असावा. शिक्षणविषयक धोरणे ठरविताना मागासवर्गीय व्यक्तींना त्यांचा प्रभाव पाडता येईल इतके प्रतिनिधीत्व द्यावे तरच ते शिक्षण मागासवर्गीयांना उपयुक्त ठरेल असे म्हणतात. त्यांनी तळमळीने मांडलेले हे विचार अंमलात आणले तर शिक्षण व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाचे व समाज परिवर्तन प्रबोधनाचे महत्त्वाचे माध्यम बनेल व मागासवर्गीय वंचित, दुर्लक्षित वर्गाचा क्रांतीस्तंभ ठरेल यात शंका नाही. म्हणून तर महात्मा जोतीराव फुले यांनी " ब्राह्मण वर्गातले शिक्षक धार्मिक पूर्वग्रहांमुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात"[8]. म्हणून खालच्या वर्गातील शिक्षक सरकारने नेमावेत असे सुचविले होते.

शिक्षक वर्ग हा समाज व राष्ट्राचा सारथी असतो. कारण त्याच्या हातात शिक्षणाच्या नाड्या असतात. तेव्हा शाळेमध्ये समबुध्दीचे, उदात्त थोर मनाचे व निःपक्षवृत्तीचा शिक्षक असला पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता की, शिक्षक व प्राध्यापक ज्ञानी, संशोधक वृत्तीचे असावेत. ते म्हणतात की प्राध्यापकांनी स्वतःला

आपल्या अध्ययन, अध्यापन, संशोधनात झोकून घ्यावे. त्यामुळे उत्कृष्ट विद्यार्थ्यांच्या माध्यमातून उत्तम नागरिक निर्माण होतील व त्यातून राष्ट्र विकास घडून येईल.

तसेच त्यांनी प्राध्यापकांवर अधिक विषयाचा, कामाचा भार असता कामा नये असे म्हटले. त्यासाठी एल्फिन्स्टन कॉलेजचे उदाहरण दिले. तसेच विद्यार्थ्यांबद्दल ते दोन गोष्टी सांगतात की, बुध्दिमत्ते व कार्यक्षमतेत आपण कमी पडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच त्यांनी व्यक्तिगत सुखापेक्षा आपला समाज स्वतंत्र, स्वावलंबी आणि सन्मानीय कसा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. बौध्दिक शक्तीचे संवर्धन करावे, त्यांनी आपली विवेकशक्ती नेहमी जागृत ठेवावी, भरपूर वाचन करावे असे सांगतात.

मुंबई विद्यापीठ कायदा दुरूस्ती विधेयकावर चर्चा करताना त्यांनी परीक्षा पध्दतीवर कठोर टीका केली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या नावाखाली परीक्षा पध्दती कठोर केल्यामुळे मागासवर्गीय, दुर्लक्षित, गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित झाले आहेत तर त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्यासाठी अशा परीक्षा पध्दतीचा वापर केल्याचे ते म्हणतात की, 'ही परीक्षा पध्दती श्रीमंताना सोयीची व गरिबांवर अन्याय करणार आहे' असे त्यांचे निर्भिड मत होते.

डॉ. बाबासाहेबांनी राजकीय चळवळीपेक्षाही आपल्या जीवनात शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. 'शिक्षणाशिवाय आपल्या मान्याच्या जागा हाती येणार नाहीत, तोपर्यंत आपल्या हातात खरीखुरी सत्ता येणार नाही' असे ते म्हणत असत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब हे परिषदा घेताना व संस्थांची उभारणी करताना दिसतात. ज्ञान–शिक्षणामुळेच युरोपात प्रबोधन क्रांती झालेली आहे. तेव्हा या परिवर्तनाच्या प्रक्रियेत ज्ञानाचे नवे सर्जन घडणे आवश्यक आहे व त्यामध्ये शाळा व विद्यापीठांची महत्त्वाची भूमिका असे सांगतात.

शिक्षणासंबंधी त्यांनी वेळोवेळी मांडलेले विचार आजच्या युगात ही मौलिक आहेत. त्याचे नव्याने संशोधन होवू शकेल यात शंका नाही. संविधानाचे 45 वे कलम मुलांच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत सक्तीचे मोफत शिक्षण द्यावे असे सांगते, पण तसे घडत नाही. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या लेखन, भाषणातून सतत शिक्षणाद्दलचा आग्रह करतानाच ते अतिशय सूक्ष्मपणे दलितांना मार्गदर्शन करतात. त्यामध्ये मुलांना शिक्षण देण्यास कसूर करू नका. त्यांना परंपरेने चालत आलेल्या व्यवसायात गुंतवू नका, मुलां–मुलींनाही शिक्षण द्या. यासह कपडे कोणते, कसे घालावेत, स्वच्छ कसे असावेत, कसे रहावे याबाबत मार्गदर्शन करतात. 'एक नूर आदमी दस नूर कपडा' असे डॉ. बाबासाहेब म्हणत असत.

- **सहशिक्षणाचा पुरस्कार** :–

डॉ. बाबासाहेबांची स्त्री शिक्षणाबाबतची भूमिका महात्मा जोतीराव फुले यांच्याप्रमाणेच पुढारलेली अशी आहे. ज्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले, त्या उपेक्षित व चेहरा नसणाऱ्या समुहाच्या शिक्षणाबाबत ते अधिक गंभीरपणे विचार करतात. दलितांच्या शिक्षणासंबंधी विचार मांडत असतानाच ते दलित स्त्रीने ही शिकले पाहिजे, अशी भूमिका मांडतात. दलित स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार होणे डॉ. बाबासाहेबांना महत्त्वाचे वाटत असे. म्हणून तर त्यांनी 1924 साली स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभे' च्या उद्दिष्टात व 15 ऑगस्ट 1936 मध्ये स्थापन केलेल्या 'स्वतंत्र मजूर पक्ष' या आपल्या राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यामध्ये शिक्षणावर अधिक भर दिल्याचे दिसून येते.

दलित समाजातील दुर्गुण नाहीशे होण्यासाठी दलित स्त्री शिकली पाहिजे असे त्यांना वाटत असे. या भूमिकेतूनच ते स्त्री शिक्षणविषयक महत्त्व पटवून देताना प्रतिपादतात की, 'तुम्ही तुमच्या मुलांना व मुलींना शिक्षण देऊन काम करता त्या कामात त्यांना पडू न देण्याची खबरदारी घ्या. स्त्रियांना शिक्षण दिल्यास राष्ट्राच्या विकासासह तुमच्या ही अस्मितेचा विकास होईल. तुम्ही माणूस आहात ही तुमची ओळख तुम्हाला होईल'. या पध्दतीचे स्त्री शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादतात. त्याबरोबरच त्यांनी सहशिक्षणाचाही पुरस्कार केलेला आहे. स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे शाळा, कॉलेज ही कल्पना त्यांना मान्य नव्हती तर 'स्त्रियांचे शिक्षण पुरूषांच्या बरोबर एकत्र असले पाहिजे' असे ठामपणे प्रतिपादले.

ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचा सहवास घडत नाही त्या त्या ठिकाणी स्त्रियांविषयी पुरूषांच्या मनात अनुदार भावना जागृत होते. ही भावना नष्ट करण्यास सहशिक्षण हाच एकमेव उपाय आहे. तसे न घडल्यास अनीतीचा अग्नी शांत न होता जास्तच भडकत राहील असे ते प्रतिपादतात.

- **शिक्षणाच्या अंमलबजावणीत सरकारची भूमिका :–**

शिक्षण व सरकार ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षणासंबंधीच्या सर्व उपक्रमात सरकार दक्ष असणे महत्त्वाचे आहे. अन्य शिक्षण ही केवळ एकाच वर्गाची मिरास होता कामा नये. सर्वच वर्गात शिक्षणाचा प्रसार अधिक प्रमाणात होण्यासाठी सरकारने दक्ष असणे आवश्यक आहे. याबाबत डॉ. बाबासाहेबांनी सरकारकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, त्यात :–

1 मागासलेल्या वर्गाला उच्च शिक्षणाची सोय व शिक्षणविषयक सवलती दिल्या पाहिजेत.
2 प्राथमिक शिक्षणाची सक्ती बंधनकारक करून प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना सक्तीने प्रवेश दिल्याशिवाय दलितांच्या शैक्षणिक उन्नतीस अनुकूल परिस्थिती निर्माण होणार नाही.
3 प्राथमिक शिक्षणावर अधिक खर्च करावा.
4 वसतिगृहे उभारावीत.
5 अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी बजेटमध्ये तरतूद असावी.

या सर्व गोष्टी लक्षात घेता डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात शिक्षणाला किती महत्त्व दिले आहे हे लक्षात येते. मग ते मुंबई इमारत फंडाच्या निमित्ताने 1941 मध्ये केलेले भाषण असो वा मुंबई विधान परिषदेत वेळोवेळी शिक्षणविषयक मांडलेले विचार असोत. म्हणून ते म्हणतात की, 'व्यक्तीला जाणिव देते ते शिक्षण होय' तशी ती अस्पृश्य समाजाबद्दल होती.

## संदर्भ ग्रंथ सुची


1 औरंगाबाद येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजच्या शिलान्यास प्रसंगी व्यक्त केलेले विचार, जनता, दिनांक 22 सप्टेंबर 1951.
2 आप घरी बाटा, बाप घरी ही बाटा ! ब. भा. 15 जुलै 1927.
3 तत्रैव.
4 महात्मा फुले – समग्र वाङ्मय, संपा. कीर, मालशे आणि य. दि. फडके, परिशिष्ट 5, पाचवी आवृत्ती, 2006.
5 तत्रैव.
6 न्याय तरी द्या, ब. भा. 3 जून 1927.
7 म. फुले समग्र वाङ्मय, संपा. कीर, मालशे व य. दि. फडके, परिशिष्ट–5, द्वितीय आवृत्ती, 2006.